## नि.दि.मु.क्र.४३/२०१९ मधील निशाणी क्र.११८ वरील आदेश

## (CNRNO.MHSI090001972019)

०१. अर्ज व त्यावरील प्रतिवादींचा जबाब वाचला. उभयपक्षांच्या विद्वान विधिज्ञांचा युक्तिवाद श्रवण केला.

०२. प्रस्तूतच्या अर्जान्वये अर्जदार यांनी मयत प्रतिवादी क्र.०७ सिताबाई सिताराम गुरव यांच्या वारसांना दाव्याच्या अभिलेखावर घेण्यास विनंती केलेली आहे. अर्जदारच्या कथनानुसार, प्रतिवादी क्र.०७ सिताबाई ही दि.०६/१०/२०२२ रोजी मयत झाली आहे. प्रस्तूत अर्ज हा मुदतीत असल्याने सदरचा अर्ज मंजूर करणे न्यायोचित वाटते. अर्जदार यांच्या कथनानुसार प्रतिवादी क्र.०७ यांना प्रतिवादी क्र.०७अ ते ०७इ हे मयत वारस आहेत. दाव्याचे स्वरुप बघता दाव्याचे कारण अबाधित राहत असल्याने व दिवाणी प्रक्रिया संहिता आदेशिका २२ ची व्याप्ती लक्षात घेता अर्ज मंजूर करणे न्यायसंगत वाटते. परिणामी, खालील प्रमाणे आदेश पारित करत आहेः

### – आ दे श –

०१. निशाणी क्र. ११८ वरील अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

०२. प्रतिवादी क्र.०७ सिताबाई यांच्या वारसांना दाव्यात समाविष्ट करुन दुरूस्ती प्रत पुढील तारखेस किंवा त्यापुर्वी दाखल करावी.

०३. विहीत मुदतीत आदेशाची पुर्तता न केल्यास आदेश आपोआप रद्द झाल्याचे समजावे.

Digitally signed by SUNIL BABASAHEB WALKE
Date: 2022.11.17 10:49:14 +1000

स्थळ : देवगड (एस.बी.वाळके)

दिनांक : १६/११/२०२२ दिवाणी न्यायाधीश क.स्तर देवगड.